**नियमित दिवाणी दावा क्र. ११४/२०२१**

(शोभा वि. सोमनाथ व इतर)

**CNR No. MHSO07-000145-2021**

## निशाणी क्र.५३ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी त्यांच्याविरुध्द झालेला प्रतिदाव्यावरील 'विना म्हणणे व कैफियत' आदेश रद्द होऊन, त्यांना म्हणणे व कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. वादीच्या कथनानुसार, प्रतिवादी क्र.१ ने प्रतिदावा दाखल केलेची माहिती त्यांना वेळेत मिळाली नाही. तसेच त्यांच्या वकिलांच्या वैयक्तिक अडचणींमुळे त्यांना मुदतीत म्हणणे व कैफियत दाखल करता आली. सदर कामी वादीचे मोठे मौलिक हक्क गुंतलेले आहेत. सबब, त्यांच्या विरुध्द झालेला 'विना म्हणणे व कैफियत' आदेश रद्द होऊन त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले म्हणणे व कैफियत स्वीकारण्यात यावे अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रकरणाचे अवलोकन केले असता हे स्पष्ट आहे की, वादी व प्रतिवादी या दोघांचे देखील हक्क हितसंबंध दाव्यात गुंतलेले आहेत. त्यामुळे त्यांना त्यांच्या बचावाची संधी देखील मिळणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत वादीच्या विनंतीनुसार त्यांच्याविरुध्द प्रतिदाव्यावर झालेला 'विना म्हणणे व कैफियत' आदेश रद्द न केल्यास आणि त्यांना त्यांचे म्हणणे व कैफियत दाखल करण्याची परवानगी न दिल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होईल. परंतू तशाप्रकारे परवानगी दिली गेल्यास प्रतिवादीवर कुठलाही अन्याय होत नाही. उलटपक्षी दावा गुणदोषावर निकाली करण्यास त्याची मदतच होते. त्यामुळे खालील आदेशाद्वारे प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | अर्ज रक्कम रुपये २००/– खर्चासह मंजूर करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| २. | वादीने खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.१ ला पुढील तारखेपर्यंत दयावी. |
| ३. | वादीने वरीलप्रमाणे खर्चाची पूर्तता केल्यानंतर त्यांच्याविरुध्द प्रतिदाव्यावर झालेला 'विना म्हणणे व कैफियत' आदेश रद्द करण्यात येत आहे. तसेच त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले म्हणणे व कैफियत अभिलेखावर घेण्यात येत आहे. |

PRIYANKA RAMESH PATIL

Digitally signed by PRIYANKA RAMESH PATIL
Date: 2025.06.13 17:36:10 +0530

(पी. आर. पाटील)

दिनांकः– ०९.०६.२०२५ ५वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पंढरपूर

<u>Certificate</u>

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | 5th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 09.06.2025 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 09.06.2025 |
| Judgment/Order uploaded on | - | 13.06.2025 |